पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २८ /२०२३ दि. २१/०३/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** कल्याण वाहतुक उप विभाग हद्दीमध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात रेल्वे स्टेशन परिसरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत NCCL-KINJIL-KTIL कंपनी कडून वल्लीपीर चौक ते महात्मा फुले चौक दरम्यान उड्डाणपुल बांधण्याचे काम चालू आहे. सदर उड्डाणपुलाचे पिलरवर गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी, वल्लीपीर चौक ते महात्मा फुले चौक या ठिकाणी गर्डर टाकते वेळी नमुद वाहिनी जड अवजड वाहनांकरीता वाहतुकीस बंद करण्यात येणार** असल्याने, सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) वल्लीपीर चौकाकडुन कल्याण रेल्वे स्टेशनकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना वल्लीपीर चौक येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने गुरूदेव हॉटेल कल्याण रेल्वे स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.
ब) भानुसागर टॉकीज कडे जाणारी वाहने बैलबाजार स्मशानभूमी मार्गे इच्छीत स्थळजी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण रेल्वे स्टेशन कडुन वल्लीपीर चौकाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना साधना हॉटेल आर्चिज गॅलरी येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** क) सदरची वाहने साधना हॉटेल व आर्चिज गॅलरी येथुन डावीकडे वळण घेवुन गुरूदेव हॉटेल मार्गे इच्छीत स्थळी जातील.
ड) भानूसागर टॉकीज कडे जाणारी वाहने साधना हॉटेल व आर्चिज गॅलरी येथुन डावीकडे वळण घेवुन गुरूदेव हॉटेल, वल्लीपीर चौक, बैलबाजार स्मशानभूमी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

१) दि. २२/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०१ वा. ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत
२) दि. २३/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०१ वा. ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत
३) दि. २४/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०१ वा. ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत
४) दि. २५/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०१ वा. ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत
५) दि. २६/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०१ वा. ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत

सदरची वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. श्रीकांत परोपकारी )**
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

Scanned with CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

Scanned with CamScanner